नवे फौजदारी कायदे लोकसभेत मंजूर

(पान १ वरून) या विधेयकांमधून दिसत असल्याचे सांगितले. तुमचे मन भारतीय असेल तर तुम्हाला या कायद्याचे महत्त्व समजेल. परंतु मन इटलीचे असेल तर हे कायदे समजणार नाहीत, असा टोला शाह यांनी लगावला. आधीच्या कायद्यांत ब्रिटिश राजवटीचे हित जोपासले होते. नव्या कायद्यात मानव केंद्रित न्यायव्यवस्था होईल. तसेच लोकांना 'तारीख पे तारीख' मिळणार नाही, असे शाह म्हणाले. व्यक्तिस्वातंत्र्य, मानवाचा अधिकार आणि सर्वांना समान वर्तणूक या तीन सिद्धांतावर हे प्रस्तावित कायदे आधारित आहेत. आतापर्यंत आपल्या कायद्यात दहशतवादाची व्याख्या नव्हती. मोदी सरकारने प्रथमच दहशतवादाची व्याख्या केली आहे. राजद्रोहाचे कलम रद्द करून त्याजागी देशद्रोहाचे कलम आणले आहे. मॉब लिंचिंगसारख्या गंभीर गुन्ह्यासाठी फाशीची तरतूद करण्यात आली आहे. नव्या कायद्यांमध्ये महिला आणि बालकांशी संबंधित गुन्ह्यांच्या शिक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर मानवाधिकार आणि देशाच्या सुरक्षेशी संबंधित कायदे आहेत. मी स्वतः या विधेयकांसंदर्भात १५८ बैठकांमध्ये सल्लामसलत केली आहे, असे शाह यांनी सांगितले. गृहमंत्र्यांच्या उत्तरानंतर आवाजी मतदानाने ही विधेयके मंजूर करण्यात आली. चर्चेवेळी भाजपच्या खासदारांनी या विधेयकांचे समर्थन केले. तर एमआयएम प्रमुख खासदार असदुद्दीन ओवेसी आणि शिरोमणी अकाली दलाच्या खासदार हरसिमरत कौर यांनी सरकारने आपल्या हितासाठी पोलिसांचे अधिकार वाढवल्याचा आरोप करत विधेयकांना विरोध केला. पोलीस एखाद्याला दहशतवादी कसे ठरवू शकतात. दहशतवादी घोषित करणे हे न्यायालयाचे काम आहे, असा मुद्दा ओवेसींनी मांडला.

प्रस्तावित कायद्यांमधील प्रमुख तरतुदी

- देशात कुठेही गुन्हा घडला तरी त्याची शून्य एफआयआर कुठेही नोंदवता येईल. ई-एफआयआर.
- सामूहिक बलात्काराच्या प्रकरणात २० वर्षे कारावास किंवा जन्मठेपेची तरतूद.
- अल्पवयीन मुलीवर बलात्कारप्रकरणी फाशीच्या शिक्षेची तरतूद.
- मॉब लिंचिंग प्रकरणात सात वर्षांचा कारावास किंवा जन्मठेप किंवा मृत्युदंडाची तरतूद.
- प्रथमच दहशतवादाची व्याख्या करण्यात येत आहे.
- मतदारांना पैसे वाटल्यास एका वर्षाच्या शिक्षेची तरतूद.
- विवाह, नोकरी किंवा बढतीच्या आमिषाने महिलांचा लैंगिक छळ करणे किंवा ओळख लपवणे हे गुन्ह्याच्या श्रेणीत.
- फौजदारी न्याय प्रणाली पूर्णपणे बदलली जाईल आणि जास्तीत जास्त तीन वर्षांत सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न.
- कोणताही गुन्हा घडल्यास एफआयआर दाखल करण्यापासून न्याय मिळेपर्यंत संपूर्ण प्रक्रिया डिजिटल असेल.
- लैंगिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये, पीडितेचे वक्तव्य आणि त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग अनिवार्य असेल.
- पोलिसांना ९० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करावे लागले, १८० दिवसांत तपास पूर्ण करावा लागेल.
- सात वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांसाठी न्यायवैद्यक पथकाने घटनास्थळी जाणे बंधनकारक असेल.
- प्रत्येक जिल्ह्यात तीन फिरत्या न्यायवैद्यक प्रयोगशाळा असतील.
- न्यायालयांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण ९० टक्क्यांहून अधिक वाढवण्याचे उद्दिष्ट.
- २०२७ पर्यंत देशातील सर्व न्यायालये संगणकीकृत होतील.
- १५ दिवसांत संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार पाठवली जाईल.
- प्रत्येक जिल्ह्यात एक पोलीस अधिकारी असेल जो ताब्यात घेतलेल्या आरोपीच्या नातेवाईकांना अटकेचे प्रमाणपत्र देईल.
- सात वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्याबाबतीत कोणतेही सरकार पीडितेची बाजू ऐकल्याशिवाय खटला मागे घेऊ शकणार नाही.
- नोकरशहांविरुद्ध तक्रारी दाखल करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना १२० दिवसांच्या आत परवानगी द्यावी किंवा नाकारावी लागेल. उत्तर न मिळाल्यास 'होय' असे मानले जाईल.
- खटल्यांना होणारा विलंब टाळण्यासाठी न्यायव्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत.
- तीन वर्षांपेक्षा कमी तुरुंगवासाच्या प्रकरणांमध्ये, सारांश चाचणी पुरेशी असेल. यामुळे सत्र न्यायालयातील ४० टक्के खटले कमी होतील.
- सुनावणीनंतर कोर्टाला ४५ दिवसांच्या आत निर्णय द्यावा लागेल. निर्णय आठवडाभरात ऑनलाइन टाकावा लागेल.
- घोषित गुन्हेगारांची मालमत्ता जप्त करून भरपाई देण्याची तरतूद.
- संघटित गुन्हेगारी किंवा आंतरराज्य टोळ्यांच्या बाबतीत कठोर शिक्षेची तरतूद.
- किरकोळ गुन्ह्यांसाठी सामाजिक सेवेची शिक्षा सुनावली जाईल.
- फरार गुन्हेगाराच्या अनुपस्थितीत खटला चालवून शिक्षा ठोठावली जाईल.

कृष्णात खोत यांच्या 'रिंगाण'ला साहित्य अकादमी पुरस्कार

(पान १ वरून) यांच्या 'मुझे पहचानो', इंग्रजीसाठी नीलम शरण गौर यांच्या 'रेक्युम इन रागा जानकी' आणि उर्दूसाठी सादिक नवाब सहार यांच्या 'राजदेव की अमराई' या कादंबरीला यंदाच्या पुरस्काराचा मान मिळाला आहे. तर मराठी साहित्य जगतात कादंबरीकार म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे लेखक कृष्णात खोत यांची 'रिंगाण' कादंबरीही या पुरस्काराची मानकरी ठरली आहे. विस्थापित धरणग्रस्तांची भावना, येणाऱ्या अडचणी, प्राण्यांसोबतचा संघर्ष आणि बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण खोत यांनी अतिशय प्रभावीपणे आपल्या कादंबरीतून मांडले आहे. या कादंबरीचा नायक देवाप्पाची गावापासून दूर फेकले गेल्याची भावना आणि त्याच्या म्हशीचा मूळ आदिम हिंस्रभावाकडे होणारा प्रवास कादंबरीतून रंगवण्यात आला आहे. कोल्हापूरमधील पन्हाळा किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या निकमवाडी येथे जन्मलेल्या कृष्णात खोत यांनी यापूर्वी गावठाण, रौंदाळ, झडझिंबड अशा कादंबरीच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृती व संघर्ष मांडला आहे. खोत यांच्या 'रिंगाण'ला यापूर्वी महाराष्ट्र फाऊंडेशनचा पुरस्कारही मिळाला होता. मराठी साहित्य क्षेत्रातील अभिराम भडकमकर, डॉ. संतोष खेडलेकर आणि अनुराधा पाटील या ज्युरींनी 'रिंगाण'ची निवड केली. तर कोकणी साहित्यिक डॉ. प्रकाश पर्येकर यांना 'वर्सल' या लघुकथा संग्रहासाठीही साहित्य अकादमी पुरस्कार घोषित करण्यात आला. 'वर्सल'मध्ये धनगर, वानरमारे व आदिवासी समाजाच्या व्यथा प्रभावीपणे मांडल्या आहेत. पर्येकर यांना यापूर्वी 'इगडी, बिडी, तिगडी, था' या बालसाहित्यासाठी अकादमीचा बालसाहित्य पुरस्कारही मिळला होता. कोकणातील सत्तरी येथील असलेले पर्येकरांचे लेखन हे ग्रामीण संस्कृती व गावकऱ्यांच्या जीवनावर आधारित आहे.

अवैध फोन टॅपिंग केल्यास ३ वर्षांची कैद, २ कोटींचा दंड!

(पान १ वरून) संरक्षण होईल आणि कोणीही फसवणूक करून सीमकार्ड घेऊ शकणार नाही, असा दावा केला. विधेयकानुसार कोणी राष्ट्रीय सुरक्षा, दुसऱ्या देशांसोबतच्या मैत्रीपूर्ण संबंधांविरोधात कोणी काही कृत्य केले, सीम क्लोनिंग, फोन टॅपिंगसह दूरसंचार उपकरणांचा अवैध वापर केल्यास तीन वर्षांपर्यंतची कैद किंवा दोन कोटी रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा ठोठावल्या जाऊ शकतात. सरकारला वाटले तर कोणत्याही दूरसंचार सेवेवर नियंत्रण मिळवू शकते. तसेच कोणत्याही व्यक्तीची दूरसंचार सेवा निलंबित किंवा समाप्त करू शकते. महत्त्वाच्या दूरसंचार पायाभूत सेवा, नेटवर्कचे नुकसान केल्यास ५० लाख रुपयांपर्यंतची भरपाई मिळेल. अनधिकृत दूरसंचार उपकरण लपवल्याचा संशय आल्यास केंद्र सरकारने नेमलेला कोणताही अधिकारी कोणतीही इमारत, वाहन, जहाज, विमानाची झडती घेऊ शकतो. १००हून अधिक परवान्यांच्या जागी एक परवाना आणून लायसन्स राज संपुष्टात आणण्यात येईल. लिलावाशिवाय स्पेक्ट्रम वाटपाची तरतूद या विधेयकात आहे. वैष्णव यांच्या उत्तरानंतर सभागृहाने विधेकाला आवाजी मतदानाने मंजूर केले. बीएसएनएल फायद्यात असून लवकरच ही सरकारी दूरसंचार कंपनी ४ जी, ५ जी सेवा सुरू करणार आहे, असे वैष्णव यांनी सांगितले.

कळंबमध्ये एकाच कुटुंबातील चौघांची हत्या

(पान १ वरून) अख्खे कुटुंबच संपवले. गाढ झोपेत असलेल्या पत्नी व मेव्हण्याची शेतात, तर सासरा, मोठ्या मेव्हण्याची घरात घुसून सबलीने प्रहार करीत निर्घृण हत्या केली. यामध्ये सासू गंभीर जखमी असून, तिची मृत्यूशी झुंज सुरू आहे. आरोपी तालुक्यातील तिरझडा येथील पारधी बेडा येथे सासूरवाडीत कामासाठी महिनाभरापासून राहत होता. आरोपी हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मानसिक त्रास देत सतत मारहाण करायचा. वर्षभरापूर्वी पत्नीने पती संशय घेतो व मारहाण करतो, असे दोन्ही भावांसह वडिलांना सांगितले होते. त्यानंतर या तिघांनी आरोपीला समज दिली होती. मात्र त्यानंतरही आरोपी पत्नीला त्रास देत होता. वर्षभरापूर्वी सासऱ्यासह दोन्ही मेव्हण्यांनी गोविंदाला सबलीने मारहाण केली होती. त्यामुळे मारहाणीचा वचपा आणि पत्नीवरील संशय यातून गोविंदाने पत्नीसह सासरा व दोन मेव्हण्यांची सबलीने वार करून हत्या केली, तर सासूला गंभीर जखमी केले. याप्रकरणी कळंब पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून आरोपीस दुचाकी व सबलीसह अटक केली. अधिक तपास ठाणेदार दीपमाला भेंडे, पीएसआय आशिष शिंदे, पीएसआय सागर भारस्कर, पीएसआय सुरेश झोटिंग, ओम धारणे, राजू कुळमेथे, राजू इरपाते, गजानन धात्रक आदी करीत आहेत.

बॅडमिंटनपटू सात्त्विक-चिराग यांना खेलरत्न

(पान १ वरून) वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचे नाव अर्जुन पुरस्काराच्या यादीत समाविष्ट करावे, अशी विशेष विनंती खुद्द भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) केली होती. यापूर्वी या दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च क्रीडा पुरस्कारासाठी त्याची कधीच शिफारस झालेली नव्हती. अर्जुन पुरस्कारांमध्ये हातहीन तिरंदाज शीतल देवी, पुरुष हॉकीपटू कृष्णा बहादूर पाठक आणि सुशीला चानू, तिरंदाज ओजस प्रवीण देवतळे आणि अदिती गोपीचंद स्वामी, बॉक्सर मोहम्मद हुसामुद्दीन, बुद्धिबळपटू आर. वैशाली, गोल्फर दीक्षा डागर, नेमबाज ऐश्वर्या प्रतापसिंग तोमर, प्रिन्संग तोमर, प्रतापसिंह तोमर यांचा समावेश आहे. गेम्स रौप्यपदक विजेता वुशू खेळाडू नौरेम रोशिबिना देवी आणि टेबल टेनिसपटू अहिका मुखर्जी, गणेश प्रभाकरन (मल्लखांब), महावीर सैनी (पॅरा ॲथलेटिक्स), ललित कुमार (कुस्ती), आर.बी. रमेश (बुद्धिबळ) आणि शिवेंद्र सिंग (हॉकी) यांची प्रशिक्षकांसाठीच्या द्रोणाचार्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कारासाठी कविता सेल्वराज (कबड्डी), मंजुषा कंवर (बॅडमिंटन) आणि विनीत कुमार शर्मा (हॉकी) यांची निवड करण्यात आली आहे. यावर्षीचा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार आणि अर्जुन पुरस्कार ठरवण्यासाठी क्रीडा मंत्रालयाने १२ सदस्यीय समिती स्थापन केली होती. अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती ए.एम. खानविलकर यांच्याशिवाय हॉकीपटू धनराज पिल्ले, माजी टेबल टेनिसपटू कमलेश मेहता, माजी बॉक्सर अखिल कुमार, महिला नेमबाज आणि विद्यमान राष्ट्रीय प्रशिक्षक शुमा शिरूर, माजी क्रिकेटपटू अंजुम चोप्रा, बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे आणि पॉवरलिफ्टर फरमान पाशा यांचाही समावेश आहे.

विविध पुरस्कारांसाठी निवडलेल्या खेळाडूंची यादी पुढीलप्रमाणे आहे

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार : सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी (बॅडमिंटन). अर्जुन पुरस्कारप्राप्त खेळाडूंमध्ये मोहम्मद शमी (क्रिकेट), अजय रेड्डी (दिव्यांग क्रिकेट), ओजस प्रवीण देवतळे, अदिती गोपीचंद स्वामी (तिरंदाजी), शीतल देवी (पॅरा तिरंदाजी), पारुल चौधरी आणि मुरली श्रीशंकर (ॲथलेटिक्स), मोहम्मद हुसामुद्दीन (बॉक्सिंग), आर. वैशाली (बुद्धिबळ), दिव्यकृती सिंह आणि अनुष अग्रवाल (घोडेस्वारी), दीक्षा डागर (गोल्फ), कृष्ण बहादूर पाठक आणि सुशीला चानू (हॉकी), पिंकी (लॉन बॉल), ऐश्वर्या प्रतापसिंह तोमर आणि ईशा सिंह (नेमबाजी), अंतिम पंघाल आणि सुनील कुमार (कुस्ती), ऐहिका मुखर्जी (टेबल टेनिस), नाओरेम रोशिबिना देवी (वुशू), पवन कुमार आणि रितु नेगी (कबड्डी), नसरीन (खो-खो), हरिंदर पाल सिंह संधू (स्क्वाश), प्राची यादव (पॅरा केनोइंग) यांचा समावेश आहे. ध्यानचंद आजीवन पुरस्कारासाठी कविता सेल्वराज (कबड्डी), मंजुषा कंवर (बॅडमिंटन), विनीत कुमार शर्मा (हॉकी) यांची, तर द्रोणाचार्य पुरस्कारासाठी गणेश प्रभाकरन (मल्लखांब), महावीर सैनी (पॅरा ॲथलेटिक्स), ललित कुमार (कुस्ती), आर. बी. रमेश (बुद्धिबळ), शिवेंद्र सिंह (हॉकी) यांची निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे द्रोणाचार्य आजीवन पुरस्कारासाठी जसकीरज सिंह ग्रेवाल (गोल्फ), ई. भास्करन (कबड्डी), जयंत कुमार पुशीलाल (टेबल टेनिस) यांची निवड झाली आहे. मौलाना अबुल कलाम आजाद चषक गुरुनानक देव युनिव्हर्सिटी (अमृतसर) यांना मिळाला असून लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (पंजाब) आणि कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी यांना उपविजेतेपद मिळाले आहे.

कोविड भ्रष्टाचाराचे सत्य लवकरच बाहेर!

(पान १ वरून) सुरुवात जिजामाता उद्यान येथील पेंग्विनपासून सुरू झाली. रेमडेसिवीरच्या कंत्राटात मोठा गैरव्यवहार झाला. लाइफलाइन हॉस्पिटलच्या माध्यमातून जनतेला लुटले, तर स्वतःची घरे भरली गेली. काही ठिकाणी रुग्ण आणि डॉक्टरही काल्पनिक होते. आरोग्य व्यवस्था रस्त्यावर असताना घरी बसणाऱ्यांनी देशात एक नंबरचा सीएम आहे, हे दाखवू नये. घरात बसून एक नंबर कसे होतात, असा सवाल करताना तो नंबर पुढून नाही, तर शेवटून होता. आदित्य राजाच्या कृपेने वरुणराजाच्या टेंडरचा पाऊस पडला. एकाच व्यक्तीला ५७ टेंडर दिली. 'सर्व टेंडर सगेसोयऱ्यांच्या घरी, अन् जनतेने फिरावे दारोदारी' अशी परिस्थिती निर्माण झाली. जिथे टेंडर तिथे सरेंडर असा प्रवास सुरू आहे. धारावी पुनर्विकासाची निविदा विशेष लोकांना काम देण्यासाठीच टेंडर रद्द केले होते. आता 'खर्चे के लिए मोर्चा' सुरू असल्याची टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनेवर केली.

बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त - टी प्रभाग

ई-निविदा सूचना

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, खालील ऑनलाइन निविदा मागवीत आहेत.

कामाचे नाव	इसारा रक्कम ठेव रु.	छाननी प्रभार	बोली सुरू होण्याची तारीख आणि वेळ	बोली समाप्तीची तारीख आणि वेळ
१	२		३	४
फर्निचर/लॉकर्स, विद्युत स्थापना कामाच्या पुरवठ्यासह अॅल्युमिनिअम कॅबिन/ पार्टीशनचे फॅब्रिकेशन आणि स्थापना आणि प्लम्बिंग कार्य (बोली क्र. ७२०००६९९२२)	रु.११,५००/-	रु. ३०००/- +१८% जीएसटी	२०.१२.२०२३ सायं ०५:०० वा.	२६.१२.२०२३ ०४:०० वा.

निविदा प्रत ई-प्रापण विभागांतर्गत बृमुंपा पोर्टल (http://www.mcgm.gov.in) येथून डाऊनलोड करू शकता.
अधिक तपशिलासाठी, http://www.mcgm.gov.in वर लॉग ऑन करा.

हस्ता/-
(श्री.अजय पाटने)
सहाय्यक आयुक्त
टी-प्रभाग

पीआरओ/२३५२/जाहि./२०२३-२४

खाण्यापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.

MAHATRANSCO

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER EXTENSION NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco ETendering website https://srmetender.mahatransco.in for following work

Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-9/23-24 (RFX No. 7000029335)	Period for Submission of E-Bid: 20.12.2023 to 27.12.2023 up to 23:59 hrs

Name of Work: AMC for various bay maintenance activities to be carried out under planned and emergency outages at 400kV RS, Kharghar.

Estimated Cost :	EMD (Rs.):	Tender Fee (Rs.):	Closing Date	Technical Opening Date	Commercial Opening Date
Limited to Rs. 25,00,000/- (Including GST)	Rs. 25,000/-	Rs. 590/- including GST	27.12.2023 up to 23:59 hrs	28.12.2023 at 10:00 hrs (If possible)	28.12.2023 at 10:15 hrs (If possible)

Contact Persons: 1) Mr. A.R.Gawale, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9930862767
2) Ms. P.C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website www.mahatransco.in

1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website. **2]** Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date. MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems. **Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.

Sd/-
Executive Engineer (I/C.),
400kV R.S. (O&M) Dn.,Kharghar

मोफा अधिनियमातील (नियम ११(९)(ई) च्या फॉर्म/XIII नुसार जाहीर सूचना

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)
सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालय
महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स अॅक्ट, १९६३ च्या कलम ५ए अंतर्गत
म्हाडा बिल्डिंग, तळमजला, रूम नं. ६९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१.

जा.क्र.जिउनि-३/मुंबई/ मानीव अभिहस्तांतरण/जाहीर नोटीस/३८७९/२०२३ दि. २०.१२.२०२३
महाराष्ट्र मालकी सदनिका (बांधकाम प्रवर्तन, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण विनियमन) कायदा, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज

जाहीर सूचना

अर्ज क्र. १६८/२०२३

ओम शनाज को-ऑप हौ. सोसा. लि., सीटीएस क्र. १३१०, सर्व्हे क्र. १४१, ७ बंगलो, जे.पी.रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८. ..... **अर्जदार विरुद्ध १) मे. नताशा- मेहर एसोसिएट्स, भागीदारी संस्थांद्वारे - भागीदार श्रीमती नर्गिस जल हराधवाला, श्रीमती अर्नावाझ येझदियार एडल- हहरम**, यांचा कार्यालयाचा पत्ता : ए/१०, पाशूर बाग, ३७६, व्हीपी रोड, मुंबई - ४०० ००४. २) **होसंग रुस्तमजी संजना**, मालमत्तेनुसार जमिनी मालकांचा पत्ता : सीटीएस क्र. १३१०/ए, गाव वर्सोवा, तालुका अंधेरी, सीटीएस क्र. १३१०, सर्व्हे क्र. १४१, ७ बंगलो, जे.पी.रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८. ३) **नताशा सीएचएस लि.**, पत्ता : सीटीएस क्र. १३१०, सर्व्हे क्र. १४१, ७ बंगलो, जे.पी.रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८. ......**विरोधक** आणि खालील नमूद केलेल्या मिळकतीवर ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे खालील नमूद सुनावणीच्या दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मालमत्तेचे वर्णन :-

दावा केलेले क्षेत्र
अर्जदार सोसायटीच्या नावे पुढील विवरणीत जमिनीचे एकतर्फी अभिहस्तांतरण, धारक जमिनीचा मोजमापित ९७४.८३ चौ.मीटर अधिक आर.जी. क्षेत्रातील मालमत्तेचे हक्क, मोजमापित १७२.०३ चौ.मीटर संलग्न ३९९१.०० चौ.मीटर पैकी एकूण ११४६.८६ चौ.मीटर, जमिनीचा धारक सीटीएस क्र. १३१०/ए, गाव वर्सोवा, तालुका अंधेरी, शहर सर्व्हे कार्यालय अंधेरी, मुंबई उप-नगर जिल्हा व २८.७४%, डी.पी. रोडच्या एफएसआयचा फायदामुळे प्रमाणबद्ध हक्क, मोजमापित क्षेत्र १५९६.२० चौ.मीटर पैकी मोज. ४५८.६९ चौ.मीटर क्षेत्र मंजुर प्लाननुसार, स्थित जे. पी. रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०० ०५८.

वरील प्रकरणाची सुनावणी **दि. ०८.०१.२०२४** रोजी **दु. ३.०० वाजता.**

शिक्का

सही/-
(राजेंद्र वीर)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर (३),
सक्षम प्राधिकारी मोफा, १९६३ च्या कलम ५ ए अंतर्गत

मोफा अधिनियमातील (नियम ११(९)(ई) च्या फॉर्म/XIII नुसार जाहीर सूचना

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)
सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालय
महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स अॅक्ट, १९६३ च्या कलम ५ए अंतर्गत
म्हाडा बिल्डिंग, तळमजला, रूम नं. ६९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१.

जा.क्र.जिउनि-३/मुंबई/ मानीव अभिहस्तांतरण/जाहीर नोटीस/३८९०/२०२३ दि. २०.१२.२०२३
महाराष्ट्र मालकी सदनिका (बांधकाम प्रवर्तन, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण विनियमन) कायदा, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज

जाहीर सूचना

अर्ज क्र. १६५/२०२३

जागीर को-ऑप हाऊ. सोसा. लि., प्लॉट क्र. २०१, सीटीएस क्र. ३७३, ३७३/१, ३७३/२, ३७३/३, ३७३/४, गाव कोंडिविता, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९. ...... **अर्जदार विरुद्ध १) मे. जागीर बिल्डर्स**, कामा चेंबर्स, १ ला मजला, २३, नागिनदास मास्टर रोड, बॉम्बे- ४०० ०२३. **२ए) जाफर अख्तर हुसैन, बी) आरिफ अख्तर हुसैन, सी) इसरत अख्तर हुसैन, डी) नजम अख्तर हुसैन, ई) रहना अख्तर हुसैन, एफ) साहिदा अख्तर हुसैन, जी) जाहिदा अख्तर हुसैन**, यांचा पत्ता : प्लॉट क्र. २०१, सीटीएस क्र. ३७३, ३७३/१, ३७३/२, ३७३/३, ३७३/४, गाव कोंडिविता, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०५९. .....**विरोधक** आणि खालील नमूद केलेल्या मिळकतीवर ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे खालील नमूद सुनावणीच्या दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मालमत्तेचे वर्णन :-

दावा केलेले क्षेत्र
अर्जदार सोसायटीच्या नावे पुढील विवरणीत जमिनीचे एकतर्फी अभिहस्तांतरण, धारक जमिनीचा मोजमापित २४२८.११ चौ.मीटर धारक सीटीएस क्र. ३७३, ३७३/१, ३७३/२, ३७३/३, ३७३/४ मालमत्तेच्या नोंदणीकृत कार्डमधील विशेष सेट नुसार व विक्रीकरिता कराराच्या कॉपीसहित इमारत स्थित, प्लॉट क्र. २०१, सीटीएस क्र. ३७३, ३७३/१, ३७३/२, ३७३/३, ३७३/४, गाव कोंडिविला, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.

वरील प्रकरणाची सुनावणी **दि. ०८.०१.२०२४** रोजी **दु. ३.०० वाजता.**

शिक्का

सही/-
(राजेंद्र वीर)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर (३),
सक्षम प्राधिकारी मोफा,
१९६३ च्या कलम ५ ए अंतर्गत

मोफा अधिनियमातील (नियम ११(९)(ई) च्या फॉर्म/XIII नुसार जाहीर सूचना

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)
सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालय
महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स अॅक्ट, १९६३ च्या कलम ५ए अंतर्गत
म्हाडा बिल्डिंग, तळमजला, रूम नं. ६९, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१.

जा.क्र.जिउनि-३/मुंबई/ मानीव अभिहस्तांतरण/जाहीर नोटीस/३८८३/२०२३ दि. २०.१२.२०२३
महाराष्ट्र मालकी सदनिका (बांधकाम प्रवर्तन, विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण विनियमन) कायदा, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज

जाहीर सूचना

अर्ज क्र. १६९/२०२३

डोरिस टेरेस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., सीझर रोड, अंबोली व्हिलेज, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८. ..... **अर्जदार विरुद्ध १) मे. अर्पित इस्टेट प्रा. लि.**, २०४, गोयल शिपिंग अॅर्केड, ऑफ रेल्वे स्टेशन, बोरिवली (पश्चिम), मुंबई- ४०० ०९२. **२) श्री. एड्रियन डीमेलो, ३) श्री. व्हेंसेस्लॉस डीमेलो, ४) श्री. फॅड्रिक बी. डीमेलो, ५) श्रीमती आयव्ही पिमेन्टा, ६) श्रीमती डोरिस डीसिल्वा, ७) श्रीमती सेलीन डीअबेरो मालमत्ता कार्डनुसार जमिनीचे मालक..** (पत्ता २ ते ७) ३५७/१, सर्व्हे क्र. १२५ बी, सीझर रोड, अंबोली व्हिलेज, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ०५८. ......**विरोधक** आणि खालील नमूद केलेल्या मिळकतीवर ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी त्यांचे म्हणणे खालील नमूद सुनावणीच्या दिवशी व वेळी हजर राहून सादर करावे. अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

मालमत्तेचे वर्णन :-

दावा केलेले क्षेत्र
अर्जदार सोसायटीच्या नावे पुढील विवरणीत जमिनीचे एकतर्फी अभिहस्तांतरण, धारक जमिनीचा प्लॉटचे मोजमापित ६८५.९ चौ.मीटर वा समतुल्य व जमिनीचा सर्व भाग व भूखंड मालमत्ता धारक स्थित सीटीएस क्र. ३५७-३५७/१, ३६२, सर्व्हे क्र. १२५/बी, सीझर रोड, गाव अंबोली, तालका अंधेरी व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत, नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगरापैकी विशेष सेटमधील रोड, खआर (प.), मुंबई - ४०० ०५२.

वरील प्रकरणाची सुनावणी **दि. ०८.०१.२०२४** रोजी **दु. ३.०० वाजता.**

शिक्का

सही/-
(राजेंद्र वीर)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर (३),
सक्षम प्राधिकारी मोफा,
१९६३ च्या कलम ५ ए अंतर्गत

निडो होम फायनान्स लिमिटेड

nido HOME FINANCE

(पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, टॉवर ३, विंग 'बी', कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७० शाखा

ई-लिलाव - वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.
सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, थकीत कर्जाच्या वसुलीकरिता खालील तक्त्यामध्ये निर्देशित वसुली रकमेकरिता खालील निर्देशित मालमत्तेची **''जशी आहे जेथे आहे तत्त्वावर'' व ''जशी आहे जी आहे तत्त्वावर''** विक्री करण्यात येत आहे. सदर मालमत्ता ही त्यांच्याद्वारे प्राप्त कर्जाकरिता **निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** यांच्याकडे गहाण आहे. प्रतिभूत धनकोंचा खालील निर्देशित प्रतिभूत संपत्तींचा प्रत्यक्ष ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदाराचे नाव	वसुली रक्कम	राखीव मूल्य व इरठे	लिलाव दिनांक व वेळ	परीक्षणाचा दिनांक व वेळ	प्रत्यक्ष ताबा दिनांक
१.	**सुनील जे. गावडे (कर्जदार) व समिधा सुनील गावडे (सहकर्जदार)**	एलएएन नं. **एलकेवायएनएसटीएच००००७१५०३** करिता दि. **१९.१२.२०२३** रोजीनुसार **रु. २३,६६,१८९.९९** (रु. तेवीस लाख सहासष्ट हजार एकशे एकोणनव्वद व नव्याण्णव पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज+कायदेशीर खर्च.	**रु. २३,५५,५६२/-** (रु. तेवीस लाख पंचावन्न हजार पाचशे बासष्ट मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. २,३५,५५६/-** (रु. दोन लाख पस्तीस हजार पाचशे छप्पन्न मात्र)	**२५.०१.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयंविस्तारासह)**	**१०.०१.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००**	**०२.१२.२०२३**
प्रतिभूत संपत्तीचा तपशील - मालमत्तेची अनुसूची : पुढील विवरणीत फ्लॅटचा सर्व तो भाग व भूखंड - फ्लॅट क्र. १०३, पहिला मजला, ''बी'' विंग, मोजमापित चटई क्षेत्रफळ ४१.४८ चौ. मी. (बाल्कनींसमवेत), इमारतीचे नाव ''गणेश कॉम्प्लेक्स'', एनए व सर्व्हे क्र. ६२ (पार्ट) धारक मोजमापित १३८० चौ. मी. क्षेत्रफळाच्या, सर्व्हे क्र. ६२ (पार्ट) धारक मोजमापित १३८० चौ. मी. क्षेत्रफळाच्या, सर्व्हे क्र. ७६, हिस्सा क्र. ६/२/१ धारक मोजमापित ३२० चौ. मी. क्षेत्रफळाच्या व सर्व्हे क्र. ७६, हिस्सा क्र. ६/१/२ धारक मोजमापित २९० चौ. मी. क्षेत्रफळाच्या एकत्रित मोजमापित ३३७० चौ. मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर निर्मित, गाव वालीवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, कुळगाव-बदलापूर महापालिका हद्दीतील व नोंदणीकरण जिल्हा ठाणे व उपजिल्हा उल्हासनगर येथील.						
२.	**मोह. याकूब अब्दुल कादर शेख (कर्जदार), रेश्मा मोहम्मद याकूब शेख (सहकर्जदार)**	एलएएन नं. **एलकेवायएनएसटीएच००००७५३२९** करिता दि. **१९.१२.२०२३** रोजीनुसार **रु. १८,२६,८५०.८१** (रु. अठरा लाख सव्वीस हजार आठशे पन्नास व एक्याऐंशी पैसे मात्र) अधिक त्यावरील पुढील व्याज+कायदेशीर खर्च.	**रु. १९,५२,०००/-** (रु. एकोणीस लाख बावन्न हजार मात्र) **इसारा रक्कम ठेव : रु. १,९५,२००/-** (रु. एक लाख पंचाण्णव हजार दोनशे मात्र)	**२५.०१.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयंविस्तारासह)**	**१०.०१.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००**	**०६.१२.२०२३**
प्रतिभूत संपत्तीचा तपशील - मालमत्तेची अनुसूची : अपार्टमेंट/फ्लॅट क्र. १०१, मोजमापित २४.२० चौ. मी. चटई क्षेत्रफळ स्वरूपातील, खुली बाल्कनी क्षेत्र ७.७२ चौ. मी., कपाट ०.९० चौ. मी., पहिला मजला, ''ब्रह्मा हाइट्स'' नावाने ज्ञात इमारत - सदर इमारतीचा भाग असलेल्या, दिलकॅप कॉलेजजवळ, दिलकॅप कॉलेज रोड, नेरळ (पूर्व), नेरळ-४१० १०१, सर्व्हे क्र. १५६, प्लॉट क्र. ७, ८ व ९ धारक बिगरशेतजमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित, गाव ममदापूर, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, विमा उपनिबंधक कर्जत-रायगड यांच्या हद्दीतील, नोंदणीकरण जिल्हा रायगड येथील.						

टीप : १. लिलाव वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net च्या माध्यमातून ऑनलाइन आयोजित करण्यात येईल व केवळ वैध ई-मेल, ओळखीचा पुरावा व छायाचित्राचा पुरावा, पॅन कार्ड असलेले व इरठेचे प्रदान धनाकर्ष/एनईएफटी/आरटीजीएसद्वारे केलेले बोलीदारच केवळ सदर **ऑनलाइन ई-लिलावात** सहभागासाठी पात्र असतील.
२. इच्छुक बोलीदारांना खालील स्वरूपात धनाकर्ष/आरटीजीएस व एनईएफटीद्वारे त्यांची इरठे सादर करावी लागेल :
लाभार्थी नाव : निडो होम फायनान्स लिमिटेड शाखा : स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्र. ६५२२६८४५१९९, सरफेसी - ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड : एसबीआयएन०००१५९३.
३. इरठेसमवेत ऑनलाइन बोली सादरीकरणाची अंतिम तारीख : २४.०१.२०२४
४. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net येथे संपर्क साधा किंवा **श्री. मौलिक श्रीमाली यांना दूर. क्र. + ९१ ६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्पलाइन ई-मेल आयडी :** Support@auctiontiger.net येथे व्यक्तिश: संपर्क साधावा.

मोबाइल क्र. : (श्री. श्रीकांत पाठारे ९७६८७४६६२४/श्री. ज्ञानेश जोशी ९१६७०२६८१६)
दिनांक : २१.१२.२०२३

सही/- प्राधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)